दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १४६
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.०७ जानेवारी २०२५


कारण सांगणारी लोकं
यशस्वी होत नाहीत
आणि,
यशस्वी होणारे लोक
कारण सांगत नाहीत

## प्रेमप्रकरणातून बहिणीला डोंगरावरून ढकलले




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, छ. संभाजीनगर :** प्रेम प्रकरणातून चुलत भावाने तिसगाव परिसरातील खवड्या डोंगरावरून १७ वर्षीय बहिणीला ढकलून दिले. सोमवारी दुपारी उघडकीस आलेल्या या घटनेत तरुणीचा मृत्यू झाला असून, याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. मृत तरुणी ही १७ वर्ष २ महिन्याची होती. ही अंबड तालुक्यातील एका गावात आपल्या आई वडिलांसह राहत होती. ती १२ वीत शिक्षण घेत होती. दरम्यान ती १० दिवसांपूर्वी वाळूज येथील वळदगाव येथे तीच्या काकाकडे राहण्यासाठी आली होती. सोमवारी दुपारी तीच्या चुलत भावाने मृत तरुणीला दुचाकीवरून खवड्या डोंगरावर नेले व तेथून तिला ढकलून दिले. यात तरुणीचा मृत्यू झाला.

## शिक्रापूरमध्ये भरधाव ट्रकची दुचाकीला धडक, शाळेत जाणाऱ्या मुलांना चिरडलं, बापासह दोन मुलांचा जागीच मृत्यू

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.०६, शिक्रापूर (पुणे) :** शाळेमध्ये निघालेल्या मुलांना ट्रकने चिरडल्याच घटना पुणे जिल्ह्यातील शिक्रापूर येथे घडली आहे.



दुचाकीवरून शाळेमध्ये जात असताना ही आज घटना (दि. ६) घडली. भरधाव ट्रकने दुचाकीला जोरदार धडक दिली या अपघातामध्ये वडिलांबरोबर दोन मुलांचा मृत्यू झाला. गणेश खेडकर, तन्मय खेडकर आणि शिवम खेडकर अशी अपघातात मृत्युमुखी पडलेल्या तिघांची नावं आहेत. तन्मय तिसरीमध्ये शिकत होता तर शिवम दुसरीमध्ये शिकत होता शिक्रापूर – चाकण महामार्गावर अपघात झाला असून याप्रकरणी शिक्रापूर पोलिसांनी ट्रक चालकाला ताब्यात घेतले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शिक्रापूर – चाकण महामार्गावर सकाळी ट्रक आणि दुचाकीचा भीषण अपघात झाला.

शाळेसाठी दुचाकीवरून चाललेल्या एका युवकासह दोन चिमुकल्यांना ट्रकने चिरडले. यामध्ये तिघांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरामध्ये खळबळ उडाली असून घटनास्थळी नागरिकांनी मोठी गर्दी केली आहे. तिघांचेही मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. गणेश खेडकर हा गणेश दोन मुलांना दुचाकीवरून शाळेमध्ये सोडण्यासाठी घेऊन जात होता. त्याचवेळी पशु खाद्य वाहून नेणाऱ्या भरधाव ट्रकने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. यामध्ये ट्रकने तिघांनाही चिरडले. शाळेमध्ये पोहचण्यापूर्वीच दोन मुलांना आपला जीव गमवावा लागला आहे. या अपघातानंतर नागरिक चांगलेच संतप्त झाले आहेत. शिक्रापूर पोलिसांनी ट्रक चालकाला ताब्यात घेत पुढील तपास सुरू केला आहे. सध्या याप्रकरणी ट्रक चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

## निर्धारीत केलेले लक्ष सर्वांच्या सहकार्याने पूर्ण करू : विश्वनाथ कोरडे




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.६, पारनेर (अ.नगर) :** भाजपचे सदस्य नोंदणी महाभियान पारनेर तालुक्यात यशस्वीरीत्या राबविण्यासंदर्भात भाजपाच्या तालुकास्तरीय पदाधिकारी, कार्यकर्ते व बुथ प्रमुखांची नियोजित बैठक पारनेर भाजपा कार्यालयात सोमवारी यशस्वीरित्या संपन्न झाली. यावेळी तालुकाभरात ५० हजार सदस्य नोंदणीचे निर्धारीत केलेले लक्ष सर्वांच्या सहकार्याने निश्चितच पूर्ण करू असा विश्वास भाजपाच्या प्रदेश कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ कोरडे यांनी व्यक्त केला.

यावेळी कोरडे यांच्या समवेत भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे, सुभाष दुधाडे, दत्तानाना पवार, सागर मैड, अशोक चेडे, पोपट लोंढे, बडवे काका, बाळासाहेब रेपाळे, किरण कोकाटे, नवनाथ सालके, अर्जुन नवले, काशिनाथ नवले, कानिफनाथ ठुबे, अशोक पवार यांसह तालुक्यातील विविध गावचे कार्यकर्ते उपस्थित होते. पारनेरसह तालुकाभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करीत अभियानाची सुरुवात करण्यात येणार असून प्रत्येक बूथवरील व्यापारी, शेतकरी, शेतमजूर, महिला, महाविद्यालयीन विध्यार्थ्यांसह समाजातील सर्वच घटकांना या अभियानाच्या माध्यमातून भाजपचे सदस्य करण्यात यावे असे आवाहन तालुकाध्यक्ष राहुल शिंदे यांनी केले तर तालुक्यातील आठवडे बाजारांत तसेच नागरिकांची वर्दळ असलेल्या भागांत भाजपाचे युवा कार्यकर्ते पाच-दहांच्या गटाने उपस्थित राहून सबंधित अभियान यशस्वीपणे राबविण्यासाठी प्रयत्न करतील असे जिल्हा युवा मोर्चाचे सरचिटणीस सागर मैड यांनी सांगितले. जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, तालुकाध्यक्ष राहुल शिंदे, उपजिल्हाध्यक्ष सुभाष दुधाडे यांच्यासह तालुक्यातील व जिल्ह्यातील अनेक बडे नेते या अभियानात सामील होणार असल्याचे सांगत भाजपचे हे संघटन पर्व म्हणजे तालुक्यातील भाजपा पदाधिकार्यांसाठी मिळालेली एक सुवर्णसंधी असून प्रत्येक कार्यकर्ता या संधीच सोन करील असा आपणास ठाम विश्वास असल्याचेही कोरडे यांनी यावेळी सांगितले.

# बंगळुरू हादरलं! एकाच घरात आढळले चार मृतदेह




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, बंगळुरू :** बंगळुरूतून एक धक्कादायक घटना समोर येत आहे. बंगळुरूच्या आरएमव्ही सेकंड स्टेज भागात भाड्याने राहणाऱ्या एका सॉफ्टवेअर इंजिनअरच्या घरात चार जणांचे मृतदेह आढळळे आहेत. अनुप कुमार (३८), पत्नी राखी (३५), त्यांची पाच वर्षांची मुलगी अनुप्रिया आणि २ वर्षांचा मुलगा प्रियांश अशी मृतांची नावे आहेत. यांनी सामूहिक आत्महत्या केली की हा घातपाचा प्रयत्न आहे याबाबत पोलीस अधिक चौकशी करत आहेत. एनडीटीव्हीने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

हे कुटुंब मुळचं उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथील आहे. अनुप कुमार बंगळुरूत एका खासगी कंपनी सॉफ्टवेअर इंजिनिअर आहे. कामानिमित्त ते उत्तर प्रदेशातून बंगळुरू येथे स्थायिक झाले. सोमवारी सकाळी त्यांच्या घरात काम करणारी मदतनीस घरी आली. तिने बराचवेळ दार ठोठावूनही तिला कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे तिने तत्काळ शेजाऱ्यांना याबाबत सांगितलं. शेजाऱ्यांनी पोलिसांना फोन करून बोलावून घेतलं. पोलिसांनी घराचे दार उघडताच त्यांना समोर चार मृतदेह आढळले. यामध्ये अनुप कुमार, त्यांची पत्नी आणि दोन मुलांचा मृतदेह होता.

**मुलगी स्पेशल चाईल्ड**

IANS या वृत्तसंस्थेनुसार, प्राथमिक तपासात समोर आले आहे की, अनुप आणि राखी यांनी त्यांच्या मुलांवर आधी विषप्रयोग केला. त्यानंतर या जोडप्याने गळफास लावून आत्महत्या केली. त्यांची पाच वर्षीय मुलगी अनुप्रियाची प्रकृती ठीक नव्हती. त्यामुळे हे कुटुंब तणावात होतं. अनुप्रिया स्पेशल चाईल्ड होती. हे जोडपं पाँडिचेरीला जाणार होतं. त्यामुळे घरात आनंदी वातावरण होतं. त्यानिमित्ताने त्यांनी रविवारीच पॅकिंग पूर्ण केली होती. परंतु, त्याआधीच त्यांचे मृतदेह सापडले.

**घरात तीन मदतनीस...**

या कुटुंबाने तीन जणांना मदतनीस म्हणून ठेवले होते. दोघेजण स्वयंपाकी आणि एक जण केअर टेकर होता. प्रत्येकाला १५ हजार रुपये पगार दिला जायचा. दरम्यान, या प्रकरणी घटनास्थळी कोणतीही सुसाईड नोट सापडली नाही. त्यामुळे या प्रकरणाचा वेगळ्या बाजूनेही विचार केला जाणार आहे. सदाशिवनगर पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# मुंबई महानगर क्षेत्रात ‘केबल कार’ प्रकल्पाचा मानस

**दि.६, मुंबई :** रस्ते वाहतूक, रेल्वे तसेच मेट्रो यासारख्या सार्वजनिक वाहतूक सेवांवरील वाढता ताण लक्षात घेता भविष्यात ‘केबल कार’ सेवा विकसित होणे आवश्यक आहे. त्यासाठी या प्रकल्पाचे सर्वेक्षण करून विकास आराखडा (DPR) तयार करणे गरजेचे आहे.

केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या भेटी दरम्यान या प्रकल्पाच्या सादरीकरणाद्वारे मुंबई क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या दृष्टीने या प्रकल्पाची आवश्यकता मांडण्यात येईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

नवी दिल्ली येथे ७ जानेवारी रोजी होणाऱ्या ‘विकसित भारत २०४७’ या महत्वाकांक्षी प्रकल्पाच्या लक्ष्य प्राप्तीच्या दृष्टीने केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या सर्व राज्यांच्या परिवहन मंत्र्यांच्या बैठकीस परिवहन मंत्री प्रताप सरनाईक उपस्थित राहणार आहेत.

केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन सादरीकरणानंतर मुंबई महानगर क्षेत्रामध्ये ‘केबल कार’ प्रकल्प राबवण्यासाठी केंद्र सरकारद्वारे ‘पर्वतमाला परियोजना’ अंतर्गत सार्वजनिक खासगी भागीदारी (झझझ) अथवा केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त आर्थिक भागिदारीने रोप वे विकसित करण्याचा मानस असून यासंदर्भातील विकास आराखडा तयार करुन तत्वत: मान्यता घेण्याचा प्रयत्न राहील, असेही मंत्री श्री. सरनाईक यांनी सांगितले.



मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्यादृष्टीने या प्रकल्पाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. पालघर पासून रायगड जिल्ह्यातील उरण-पेणपर्यंत पसरलेल्या एकूण क्षेत्रामध्ये नागरिकरणाचा वेग वाढत आहे. मुंबई महानगर क्षेत्रातील वाढते नागरीकरण, वाहनांची वाढती संख्या, नवीन रस्ते व रेल्वे सेवा, प्रदूषण याबाबत काही धोरणात्मक निर्णय घेऊन आधुनिक तंत्रज्ञान व पाश्चात देशातील यशस्वी नाविन्यपूर्ण प्रकल्पाचा अभ्यास करून वाहतूक समस्या सोडवण्यासाठी ठोस प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे.

मुंबई महानगरास प्राप्त झालेले महत्त्वपूर्ण भौगोलिक स्थान, सागरी किनारा खाडीचा प्रदेश, एलिफंटासारखी प्राचीन लेणी, माथेरानसारखे थंड हवेचे पर्यटन स्थळ, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, तुंगारेश्वर वन्यजीव अभयारण्यासारखी हरित चादर जतन करून मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या वाहतूक व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्यासाठी ‘रोपवे’च्या माध्यमातून ‘केबल कार’ प्रकल्प राबवणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत परिवहन मंत्री श्री. सरनाईक यांनी व्यक्त केले आहे.

# मतदारांना फक्त दारू मटण पाहिजे !

## संजय गायकवाड यांचे वादग्रस्त वक्तव्य...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, बुलढाणा :** वेळोवेळी विरोधकांबद्दल वादग्रस्त विधाने करून बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड हे चर्चेत राहतात. आता त्यांनी मतदारांविषयी बोलताना वादग्रस्त वक्तव्य करून राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा खळबळ उडवून दिली आहे.

मोताळा तालुक्यातील जयपूर (कोथळी) येथे आमदार संजय गायकवाड यांचा तीन दिवसांपूर्वी गावकऱ्यांच्या वतीने जाहीर नागरी सत्कार करण्यात आला. नुकतेच पार पडलेल्या बुलढाणा विधासभा मतदारसंघाच्या निवडणुकीत केवळ ८४१ मतांच्या फरकाने निसटता विजय मिळाल्याचे शल्य आमदारांनी यांनी या कार्यक्रमातही बोलून दाखविले.

यावेळी शेलक्या भाषेत मतदारांवर टीका करताना संजय गायकवाड यांची जीभ घसरली. मतदारांना फक्त दारू, मटण पाहिजे, मतदार विकले गेले आहेत, असा सनसनाटी आरोप संजय गायकवाड यांनी केला. तसेच काही आक्षेपार्ह शब्दही वापरले. संजय गायकवाड यांच्या या विधानामुळे पुन्हा वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे. आमदार संजय गायकवाड यांचा विधानसभा निवडणुकीत बुलढाणा मतदारसंघातून निसटता विजय झाला. कमी फरकाने झालेला विजय त्यांच्या जिव्हारी लागल्याचे अनेकवेळा दिसून आले. दोन दिवसांपूर्वी जयपूरमध्ये संजय गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना त्यांनी पुन्हा एकदा मतदान कमी मिळाल्याबाबत खंत व्यक्त केली.



आपण मतदारसंघाचा चौफेर विकास केला, कोट्यवधींचा निधी आणला, मतदारसंघाचा कायापालट केला. तरीही मतदारांनी आपल्याला भरभरून मतदान केले नाही याला काय म्हणावे? असा उद्विग्न सवाल आमदारांनी या कार्यक्रमात आपले मनोगत व्यक्त करताना केला. यावरच न थांबता आमदार गायकवाड यांनी, आपल्या जाहीर भाषणात मतदारांसंदर्भात अनेक आक्षेपार्ह शब्द वापरले. कार्यक्रम पार पडल्यावर आता त्यांच्या भाषणाचा ‘व्हिडीओ’ समाज माध्यमावर तुफान वेगाने व्हायरल होत आहे.

आमदार संजय गायकवाड व्हिडीओत म्हणतात, ‘तुम्ही मला एक मत देऊ शकत नाही. तुम्हाला फक्त दारू, मटण पाहिजे. मी कोट्यवधींची कामे केली. तरीही लोकांनी मला मतदान केले नाही. मतदार दोन दोन हजारात विकले गेले आहेत. मी अब्जावधी रुपयांना लाथ मारली. शेवटी सत्याचा विजय झाला. माझ्या विरोधात सगळे विरोधक एक झाले. परंतु सगळे लटकले, असे आमदार ठासून म्हणाले.

मतदारांना फक्त दारू, मटण पाहिजे, मतदार विकले गेले आहेत, असा सनसनाटी आरोप संजय गायकवाड यांनी केला. तसेच काही आक्षेपार्ह शब्दही वापरले. संजय गायकवाड यांच्या या विधानामुळे पुन्हा वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.

**निसटता विजय जिव्हारी??**

संजय गायकवाड यांनी बुलढाणा मतदार संघातून यंदा दुसऱ्यांदा निवडणूक लढविली. या निवडणुकीत त्यांना शिवसेना ठाकरे गटाच्या जयश्री शेळके यांनी कडवे आव्हान दिले होते. जयश्री शेळके यांना ९० हजार ८१९ मते पडली होती. संजय गायकवाड यांना ९१ हजार ६६० मते पडली होती. गायकवाड यांचा अवघ्या ८४१ मतांनी विजय झाला होता. विधासभा निवडणूक दरम्यान आमदार गायकवाड यांनी विरोधी महाविकास आघाडीचा उमेदवार कोणताही असो आपण १ लाख १० हजाराच्या आसपास मते घेणारच असा दणदणीत दावा केला होता. आघाडीच्या उमेदवाराचा एकतर्फी पराभव करून चारी मुंड्या चित करून पराभव करणार असा दावा त्यांनी केला. प्रत्यक्षात ते केवळ ८४१ मतांनी विजयी झाले. प्रचारातच नव्हे तर मतमोजणीमध्ये देखील संजय गायकवाड आणि जयश्री शेळके यांच्यातील चुरस २४ आणि २५ व्या फेरीअखेर कायम राहिली. मात्र, अखेर गायकवाड यांनी बाजी मारली आणि ते सलग दुसऱ्यांदा बुलढाण्याचे आमदार झाले.

## संपादकीय



## दर्पणकार

मराठी भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांची आज जयंती. बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे म राठी भाषेतील पहिले वृत्तपत्र सुरू केले. बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील पोंभूर्ले या गावी ६ जानेवारी १८१२ रोजी झाला. विशेष म्हणजे त्यांनी त्यांच्या जन्म दिनीच म्हणजे ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण हे महाराष्ट्रातील पहिले वृत्तपत्र सुरू केले. वयाच्या विसाव्या वर्षीच दर्पण हे वृत्तपत्र सुरू करून बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी वृत्तपत्र व्यवसायाचा पाया घातला. त्यांनीच १८४० मध्ये दिग्दर्शन हे मराठीतील पहिले मासिक काढले. बाळशास्त्री जांभेकर यांचा लोकशिक्षण व ज्ञानप्रसार हाच हेतू या उपक्रमामागे होता. सुधारकांच्या पहिल्या पिढीने पाश्चात्य विद्या व शिक्षण आत्मसात करून नवी जीवनमूल्ये वृत्तपत्र माध्यमाद्वारे रुजवली. त्या परंपरेचा पाया बाळशास्त्री जांभेकरांनी घातला. बंगालमध्ये राजाराम मोहन रॉय यांनी सुधारणांचे युग आरंभिले तेच कार्य बाळशास्त्री जांभेकरांनी महाराष्ट्रात केले. बाळशास्त्री जांभेकर हे लहानपणा पासून हुशार होते. वयाच्या तेराव्या वर्षी त्यांनी मराठी आणि संस्कृत विषयाचे अध्ययन पूर्ण केले. नंतर ते मुंबईला गेले तिथे त्यांनी इंग्रजी विषयाचे शिक्षण पूर्ण केले. इंग्रजी विषयात देखील त्यांनी नैपुण्य मिळवले. इंग्रजीतील त्यांचे नैपुण्य पाहून इंग्रज राज्यकर्त्यांनी त्यांची एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून नेम णूक केली. त्या कॉलेजमध्ये एकूण सतरा प्राध्यापक होते त्यात बाळशास्त्री जांभेकर हे एकमेव मराठी प्राध्यापक होते. दादाभाई नौरोजी हे त्यांचेच विद्यार्थी होते. पुढे त्यांची नेमणूक शाळा तपासणीस म्हणून झाली. बोर्ड ऑफ एज्युकेशनने चांगले अध्यापक तयार करावेत अशी सूचना त्यांनी इंग्रज सरकारला केली ती सूचना मान्य करून इंग्रज सरकारने डीएड, बीएड कॉलेजची निर्मिती केली. ते शिक्षणाबाबत जितके आग्रही होते तितकेच ते सामाजिक सुधारणे बाबत आग्रही होते. केवळ शिक्षणाचा प्रसार करून चालणार नाही तर सनातनी आणि प्रतिगामी लोकांच्या मनावर बेगडी श्रद्धांचा जो कालबाह्य पगडा आहे तो हटवला पाहिजे. लोकांच्या भावना, संवेदना विशाल उदार झाल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते त्याकरिताच त्यांनी दर्पण नावाचे पहिले वर्तमानपत्र सुरू केले. दर्पणचा पहिला अंक ६ जानेवारी १८३२ रोजी प्रकाशित झाला. दर्पण हे द्विभाषिक वर्तमानपत्र होते. एकाच वेळी इंगजी व मराठीत निघणाऱ्या या वर्तम ानपत्राच्या पानातील दोन स्तंभात डावीकडचा स्तंभ इंग्रजी भाषेत तर उजवीकडच्या स्तंभात मराठी भाषांतर असे त्यात एकूण आठ पाने असत. बाळशास्त्री जांभेकर यांनी वाचकांची मागणी वाढू लागल्याने दर्पण साप्ताहिक ४ मे १८३२ पासून सुरू केले. बाळशास्त्री जांभेकर हे निर्भीड पत्रकार होते. त्यांचे लेख विचारप्रवर्तक असत. इंग्रजांच्या नोकरीत असूनही ते इंग्रज सरकार विरुद्ध बेधडक लिहायचे त्याचप्रमाणे जातपात, कर्मकांड, अनिष्ट रूढी परंपरा यावर ते आपल्या लेखणीतून सातत्याने प्रहार करीत. ६ जानेवारी हा बाळशास्त्री जांभेकरांचा जन्मदिवस आणि योगायोगाने ६ जानेवारी रोजीच दर्पणचा पहिला अंक प्रकाशित झाला असल्यामुळे हा दिवस महाराष्ट्रात पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी निर्भीड पत्रकारिता करणाऱ्या पत्रकारांना विविध संस्थांकडून गौरविले जाते. त्यांचा सन्मान केला जातो. १८ मे १८४६ रोजी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकरांचे निधन झाले. जयंतीदिनी बाळशास्त्री जांभेकरांना विनम्र अभिवादन! तसेच सर्व पत्रकार बंधूंना पत्रकार दिनाच्या मनापासून शुभेच्छा!

# बाळशास्त्री जांभेकर: आद्य मराठी पत्रकार!

कोकणात सिंधुदुर्ग जिल्ह्यात देवगड तालुक्यातील पोंभुर्ले या गावी दि.६ जानेवारी १८१२ रोजी बाळशास्त्रींचा जन्म एका पुराणिकाच्या घरी झाला. अज्ञान, दारिद्र्य आणि रुढीप्रिय समाजाच्या अंध:कारातून बाहेर पडण्यासाठी ते मुंबईत आले. तेथे बापू छत्रे यांच्या निवासस्थानी राहून त्यांनी अध्ययन सुरू केले. आपल्या विलक्षण बुद्धिचातुर्याने व तल्लख स्मरण शक्तीने त्यांनी त्या वेळच्या सार्वजनिक जीवनावर विलक्षण छाप टाकली. सन १८३०म ध्ये हिंद शाळा पुस्तक मंडळाचे सेक्रेटरी म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली आणि एक नवे क्षितिज त्यांच्यासाठी खुले झाले. त्यांनी आता ग्रंथरचनेस प्रारंभ केला. त्यानंतर वयाच्या अवघ्या २०व्या वर्षी जन्मदिनी दि.६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण या पत्राची मुहूर्तमेढ रोवली. सुधारकांच्या पहिल्या पिढीने पाश्चात्य विद्या व शिक्षण आत्मसात केले. बंगालमध्ये राजाराम मोहन रॉय यांनी सुधारणांचे नवयुग आरंभिले तेच कार्य बाळशास्त्री जांभेकरांनी! ती म हाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात नवविचारांची लाट निर्माण करण्यासाठी केली. प्रयत्नशील व वैचारिक चळवळ सुरू केली. त्यांनी समाज सुधारणा व शिक्षणाची अभिवृद्धी हेच आपले जीवनकार्य मानले.

मराठी पत्रकारितेचा पाया श्रेष्ठ दर्जाच्या संपादकाने- आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी घातला. त्यांनी अल्पावधित महाराष्ट्राच्या जीवनावर विलक्षण छाप टाकली. त्यांनी राष्ट्रीय विकासासाठी पोषक अशा बहुविध क्षितिजाचा विकास केला. त्यामुळे त्यांना पश्चिम भारतामधील प्रबोधनाचे प्रवर्तक म्हटले जाते. मराठी पत्रकारितेचा पाया भक्कम पणे उभारण्यासाठी त्यांनी बजावलेले कार्य हे आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी नोंदविण्यासारखे आहे. त्यामुळे परंपरेचा सुवर्णप्रवाह विकसित झाला.



प्रथम श्रेणीचे आद्य वृत्तपत्र म्हणून 'दर्पण' वृत्तपत्राची कामगिरी लक्षणीय अशी ठरली आहे. दर्पण हे वृत्तपत्र सन १८३२म ध्ये काढून मराठी वृत्तपत्रव्यवसायाचा त्यांनी पाया घातला. त्यांनीच सन १८४०मध्ये दिग्दर्शन हे मराठीतील पहिले मासिक काढले. त्यांचा लोकशिक्षण व ज्ञानप्रसार हाच हेतू, या उपक्रमांम ागे होता.

सुधारकांच्या पहिल्या पिढीने पाश्चात्य विद्या व शिक्षण आत्मसात करुन नवी जीवनमूल्ये वृत्तपत्र माध्यमाव्दारे रुजविली. त्या परंपरेचा पाया बाळशास्त्री जांभेकरांनी घातला. बंगालामध्ये राजाराम मोहन रॉय यांनी सुधारणांचे नवयुग आरंभिले तेच कार्य बाळशास्त्री जांभेकरांनी महाराष्ट्रात केले. मराठी पत्रकारितेच्या विचार विश्वात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर म हाराजांसारखी विलक्षण कामगिरी बजावणारे ते त्यामुळे युगप्रवर्तक पत्रकार ठरले. सन १८३४म ध्ये भारतातील पहिले प्राध्यापक- प्रोफेसर होण्याचा बहुमान त्यांना मिळाला. एलफिस्टन निधीतून त्यांच्यासाठी स्वतंत्र अध्यासन निर्माण करण्यात आले. सन १८४५मध्ये राज्यातील शिक्षण विभागाचे संचालक होण्याचा बहुम ान त्यांना मिळाला. प्राध्यापक या नात्याने अध्ययन, अध्यापन संशोधन व विस्तार ही कार्ये पार पाडण्यात त्यांनी धन्यता मानली. महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात नवविचारांची लाट निर्माण करण्यासाठी वैचारिक चळवळ सुरु केली. समाज सुधारणा व शिक्षणाची अभिवृद्धी तेच त्यांनी आपले जीवनकार्य मानले. प्राध्यापक या नात्याने केवळ अध्यापन व संशोधनात ते व्यग्र होते, असे नाही तर त्यांनी राष्ट्रीय जीवनात अनेक प्रागतिक चळवळींना गती दिली. सामाजिक प्रबोधनात वृत्तपत्रासारखे दुसरे साधन नाही, हे ओळखून त्यांनी बंगाली वृत्तपत्रांपासून प्रेरणा घेतली. राजाराम मोहन रॉय यांचे कार्य आणि बंगाली पत्रांनी केलेला झंझावाती प्रचार यामुळे ते प्रभावित झाले. त्यांनी नव्या पत्राचा संकल्प करून तो कृतीत आणला. ध्येयवादी बंगाली पत्राचा वस्तुपाठ त्यांनी गिरविला आणि त्यातून महाराष्ट्रात नवीन लोकचळवळ उभारली. गंगा-यमुना द्वैभाषिक पत्र ही परंपरा बंगालतून महाराष्ट्रात पुढे आली.

आचार्य बाळशास्त्रीं जांभेकर यांच्या समग्र जीवनाकडे पाहिले असता त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे विलोभनीय दर्शन घडते. त्यांना देशी व विदेशी ९ भाषा अवगत होत्या. मराठी, इंग्रजी, संस्कृत, बंगाली, कन्नड इत्यादीप्रमाणे त्यांनी विदेशी भाषांचाही अभ्यास केला होता. त्यांच्या अभ्यासविषयात भाषाशास्त्रे, इतिहास व संस्कृती, गणित, पदार्थविज्ञान, भूगर्भशास्त्र, पुरातत्वविद्या इत्यादीचा समावेश होता. या सर्व विषयात त्यांनी मराठी भाषेत ग्रंथरचनाही केली. त्यांच्या कार्याबद्दल तत्कालीन वृत्तपत्रांम ध्ये प्रामुख्याने बॉम्बे टाईम्स, कुरियर, ज्ञानोदय, ओरिएंटल स्पेक्टेटर इत्यादी पत्रांनी वारंवार प्रशंसा केलेली आढळते व त्यांच्या सम ाजकार्याची नोंदही घेतलेली दिसते. तत्कालीन शाळा खात्याने त्यांच्या कार्याचा गौरव केला होता. मुंबई न्यायालयाचे त्यावेळचे न्या. सर टी.ई.पैरी यांनी त्यांचा गौरव केला होता. रे.डॉ.विल्सन व न्या.चंदावरकर या तत्कालीन विद्वानांनी त्यांच्या लोकाभिमुख विद्वत्तेचा गौरव केला होता. आज बर्याच ठिकाणी पत्रकार बांधवाच्या वतीने उत्कृष्ट साहित्यिक, लेखक, कवी, समाजसेवक आदींना दर्पणकार पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येऊ लागले आहे. समाजानेही पत्रकार बांधव वृत्तसंकलनरुपात करीत असलेली अविरत- अहर्निश सेवा व न्यायदानाची धडपड लक्षात घेऊन यथोचित त्यांचाही दर्पणकार पुरस्काराने गौरव केला पाहिजे, असे जाहीरपणे सुचवावेसे वाटते.

भारतीय राष्ट्रवादाचे पितामह दादाभाई नौरोजी हे जांभेकरांचे विद्यार्थी होते. त्यांनी गुरुबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना म्हटले आहे, की ते पश्चिम भारत खंडातील अर्वाचीन विद्वान मुकुटमणी, प्रख्यात पं.अद्वितीय विद्वान होते. मुंबईना समाचार या गुजराथी पत्राने या शिक्षण महर्षींची स्मृती भारतीयांनी सतत जागृत ठेवावी, असे आवाहनही केले होते. दि.१७ मे १८४६ रोजी जांभेकरांचा आकस्मिक मृत्यू झाला. पण अल्पावधित त्यांनी बजावलेले कार्य महाराष्ट्राच्या लोकजीवनाचा कायापालट करणारे ठरले, हेच खरे!

**!! अशा या थोर आद्य पत्रकारास लाख लाख विनम्र अभिवादन !!**


**- संकलन व सुलेखन -**
**कृष्णकुमार निकोडे गुरूजी**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.**


# खालापूरच्या पाताळगंगा एमआयडीसीतील एसपीआर कंपनीला भीषण आग

**अक्षराज : मानसी कांबळे**

**दि.०५, खालापूर :** खालापूरच्या पाताळगंगा एमआयडीसीतील एसपीआर कंपनीत अचानक आग लागली. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करण्यात आले. खोपोली नगरपालिका, पाताळगंगा एमआयडीसी आणि रिलायन्स कंपनी यांच्या फायर ब्रिगेड टीम घटनास्थळी पोहोचल्या होत्या. मंडळ अधिकारी खेडकर घटनास्थळी दाखल झाले होते. याबाबत सविस्तर घटना अशी की, खालापूर तालुक्यातील रसायनिक औद्योगिक वसाहतीमधील कैरेगावातील एसपीआर फॉर्म कंपनीला आग लागली. आगीने रौद्ररूप धारण केले. ही कंपनी सिपला कंपनीसमोर आहे. आगीचे कारण अद्याप सम जले नाही. अजूनही जीवित आणि वित्तीय हानीबाबत निश्चित माहिती उपलब्ध नाही आहे.

पाताळगंगा औद्योगिक अग्निशमन दल, खोपोली नगरपालिका अग्निशमन दल आणि स्थानिक कंपनीतील अग्निशमन दल यांनी आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांच्या सूचनेनुसार नायब तहसीलदार सुधाकर राठोड व मंडळ अधिकारी खेडेकर घटनास्थळी दाखल झाले होते. रसायनिक पोलिसांचे पथक देखील घटनास्थळी पोहोचले.

तरी आग नियंत्रणात येत असल्याने खोपोली औद्योगिक वसाहतीमधील अन्य कंपनीतील अग्निशमन दलाच्या गाड्या बोलविण्यात आल्या होत्या. परिसरात धुराचे लोट पसरले होते, त्यामुळे नागरिकांना याचा त्रास होत होता. कॉस्मेटिक तयार करण्यासाठी लागणारे रॉ-मटेरियल बनविले जात होते. आग वाढत चालल्याने जेएसडब्ल्यू कंपनी, पनवेल महानगरपालिका व अन्य अग्निशमन दलांना देखील पाचारण करीत कंपनीच्या आवारात असलेले केमिकल भरलेले ट्रम्प मॅन्युअली बाजूला घेण्यात येत आले

## स्माईली..

इमोजी वापर वाढता
नवीन आले हे पीक
दीर्घ लिहिण्याऐवजी
चिन्हे पाठवणे ठीक

शब्दांची जमवाजमव
नको वाटे झिकझीक
सोपे वाटे तरणाईला
जेंव्हा भाषारेषा वीक

जगात बदल होई नवे
चिन्हांच्या भाषा शीक
एक स्माईली कामाची
प्रभावशाली भावनीक


विविधांगी किती चित्रे
जमून जाते सोयरिक
कालानुरूप बदल हो
जगत झाले आधुनिक

इंटरनेटची कलाकारी
माणसे झाली तांत्रीक
जादुची कांडी फिरवी
जसा एखादा मांत्रीक

जुनेकाळी चिन्हे होती
वेगळा त्यांचा लौकिक
आतानवी आली चिन्हे
कार्य करते अलौकिक

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# ग्रामीण भागात बिबट्यांची दहशत !!



पूर्वी क्वचितच नजरेस पडणारे बिबटे आता सर्रास नागरी वस्तीत दिसू लागले आहेत. दररोज कुठे ना कुठे बिबट्याने घुसखोरी केल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचायला मिळतेच. पूर्वी फक्त ग्रामीण भागात दिसणारे बिबटे आता पुण्या - मुंबई सारख्या मेट्रो शहरातही दिसत आहेत. पुण्या - मुंबई सारख्या मोठ्या शहरातील सोसायटी आणि कॉलनीतही बिबटे येत आहेत. बिबट्यांच्या या वाढत्या घुसखोरीम ुळे नागरी वस्तीत भीतीचे सावट निर्माण झाले आहे.

ग्रामीण भागात तर सर्रास बिबटे नजरेस पडत आहेत. सध्या ग्रामीण भागात ऊस तोडणी सुरू आहे. उसाच्या शेतात बिबट्यांची पिल्ले सापडत आहेत. ग्रामीण भागात बिबट्यांचा वावर नित्याचा बनला आहे. नागरी वस्तीत आणि शेतांमध्ये बिबट्यांचा वावर वाढल्याने बिबट्यांना पकडण्यासाठी वन विभागाकडून पिंजरे लावण्यात येतात. बिबटे नागरी वस्तीत घुसून पाळीव प्राण्यांचा फडशा पाडत आहे. काही वेळा तर बिबट्यांकडून नागरिकांवर जीवघेणे हल्ले देखील होत आहेत.

दौंड, शिरूर या तालुक्यात बिबट्यांच्या हल्ल्यात एक महिला व दोन मुलांना जीव गम वावा लागला आहे. दौंड, शिरूर, आंबेगाव, जुन्नर या पुणे जिल्ह्यातील तालुक्यात बिबट्यांनी उच्छाद मांडला असून या भागात बिबट्यांची मोठी दहशत निर्माण झाली असून नागरिक भयभीत झाले आहे त्यामुळेच या नरभक्षक बिबट्यांना वन विभागाने ठार करावे अशी म ागणी नागरिक करत आहेत अर्थात नरभक्षक बिबट्यांना ठार करणेच योग्य. याआधीही वन विभागाकडून नरभक्षक बिबट्यांना ठार मारण्यात आले आहे. काही वर्षापूर्वी जळगाव जिल्ह्यात एका नरभक्षक बिबट्याने उच्छाद मांडला होता. या नरभक्षक बिबट्याला वन विभागाकडून ठार मारण्यात आले होते.

राज्यातील ग्रामीण भागासह शहरी भागातही बिबट्यांचा वावर वाढल्याने बिबट्यांचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे पण बिबट्यांना नागरी वस्तीत घुसखोरी का करावी लागते याचाही विचार आपण करायला हवा. बिबट्यांचा जो नैसर्गिक अधिवास समजला जातो ते जंगल आज राहिले नाही. माणसांनी स्वतःच्या फायद्यासाठी जंगलतोड केली. बिबट्यांना लपण्यासाठी जी झाडे झुडपे होती त्याची कत्तल माणसांनी केली त्यामुळे बिबट्यांना नैसर्गिक अधिवास राहिला नाही. माणसांनी बिबट्यांच्या नैसर्गिक अधिवासात अतिक्रमण केले. माणसांनी बिबट्यांचा निवारा हिसकावून घेतला.

माणसानेच आधी बिबट्याच्या निवाऱ्यात घुसखोरी केली त्यामुळे बिबट्याही आता नागरी वस्तीत घुसखोरी करीत आहेत. बिबट्यांनी जर नागरी वस्तीत घुसखोरी करू नये असे आपल्याला वाटत असेल तर बिबट्यांना पुन्हा त्याचा नैसर्गिक अधिवास मिळवून द्यायला हवा. यासाठी वन विभागाने ठोस उपक्रम राबवायला हवेत. जंगलतोड थांबवायला हवी. वृक्षतोड थांबवायला हवी. वन विभागाने वृक्षारोपण म ोहीम राबवून ते वृक्ष जगवले पाहिजे. जंगलामध्ये रानावनामध्ये झुडपांची लागवड केली पाहिजे जर बिबट्यांना लपण्यासाठी झाडे झुडपे मि ळाली तर ते शेतामध्ये येणार नाहीत. बिबट्यांना त्यांचा नैसर्गिक अधिवास मिळाला तर बिबटे नागरी वस्तीत घुसखोरी करणार नाहीत.


**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**



This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

### राज्य क्रीडा दिनानिमित्त विविध क्रीडा उपक्रम राबविण्याचे आवाहन

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०६, ठाणे :** ऑलिम्पिकमधील पहिले पदक विजेते कुस्तीपटू खाशाबा जाधव यांचा जन्म दिन १५ जानेवारी हा दिवस राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येणार असून या निमित्ताने जिल्ह्यातील विविध संस्था, संघटनांनी ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव यांची जीवनगाथा व त्यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान याविषयावरील व्याख्यान तसेच विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन, क्रीडा विषयक चर्चासत्रे, नवीन खेळांविषयक चर्चासत्रे, क्रीडा प्रदर्शन, क्रीडा विषयक प्रचार व प्रसार करण्यासाठी विविध उपक्रम आयोजित करण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

राज्यात क्रीडा संस्कृतीची जोपासना करणे आणि जनतेत क्रीडाविषयक प्रोत्साहनात्मक वातावरण निर्माण होण्याच्या उद्देशाने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात दरवर्षी दि.१२ डिसेंबर ते १८ डिसेंबर या कालावधीत क्रीडा सप्ताह साजरा करण्यात यावे. तसेच महान क्रीडापटू दिवंगत मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनी म्हणजेच दि.२९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात येतो. याच धर्तीवर सन १९५२ मध्ये हेलसिंकी, फिनलँड येथील ऑलिंपिक स्पर्धेत स्वतंत्र भारताचे पहिले वैयक्तिक ऑलिंपिक पदक (कांस्य पदक) जिंकणाऱ्या महान कुस्तीपटू दिवंगत खाशाबा जाधव यांचे क्रीडा क्षेत्रातील अतुलनीय योगदान विचारात घेता राज्यासोबतच देशाचा गौरव वाढविणाऱ्या कामगिरीस सातत्याने उजाळा मिळावा तसेच त्यातून राज्याच्या विद्यमान व नवीन खेळाडूंनी प्रेरणा घ्यावी यासाठी व त्यांच्या स्मृतीला अभिवादन म्हणून त्यांचा जन्मदिन दि. १५ जानेवारी हा दरवर्षी राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात यावा, असे निश्चित करण्यात आले आहे.

त्यानुषंगाने ठाणे जिल्ह्यातील शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थाच्या तसेच शासनमान्य खाजगी अनुदानित, विनाअनुदानित व स्वंयअर्थसहाय्यित प्राथमिक व माध्यमिक शाळा, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये शासकीय तसेच शासनमान्य खाजगी विद्यापीठे, एकविध क्रीडा संस्था/असोसिएशन, क्रीडा मंडळे, क्रीडा अकादमी, शासनाच्या क्रीडा योजनांचा लाभ/अनुदान मिळालेल्या सर्व संस्था, अन्य संस्था/ मंडळे यांनी राज्य क्रीडा दिनानिमित्त ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव यांची जीवनगाथा व त्यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान याविषयावरील व्याख्यानांचे आयोजन करण्यात यावे. तसेच विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन, क्रीडा विषयक चर्चासत्रे, नविन खेळांविषयक चर्चासत्रे, क्रीडा प्रदर्शन, क्रीडा विषयक प्रचार व प्रसार करण्यासाठी विविध उपक्रम आयोजित करण्यात यावे. तसेच महाराष्ट्राचे, भारत देशाचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरविलेल्या ठाणे जिल्ह्यातील खेळाडूंनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी संपर्क करण्याचे आवाहन प्र.जिल्हा क्रीडा अधिकारी रूही शिंगाडे यांनी केले आहे.

### संघर्ष पत्रकार संघातर्फे पत्रकार सन्मान कार्यक्रम संपन्न




**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.०६, शहापूर (ठाणे) :** मराठी वृत्तपत्र दिनानिमित्त संघर्ष पत्रकार संघातर्फे पत्रकार सन्मान कार्यक्रमाचे आयोजन सोमवारी शहापूर येथील आगरी समाज सभागृहात करण्यात आले होते. यावेळी जेष्ठ पत्रकार काशिनाथ तिवरे, महेश धानके, सोमनाथ काबाडी, अध्यक्ष योगेश हजारे (अध्यक्ष संघर्ष पत्रकार संघ), शिवसेना नेते कुलदीप (बाळासाहेब) धानके. नंदकुमार मोगरे, भाजप शहापूर तालुका अध्यक्ष भास्कर जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री गणेश, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण तसेच द्विपप्रज्वलन करण्यात आले. संघर्ष पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष योगेश हजारे यांनी प्रास्ताविक केले. संघाच्या वाटचालीची माहिती विशद केली. तसेच या वर्षापासून संघातर्फे पत्रकारितेत ऊल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती, संस्था यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार असल्याचे जाहीर केले. त्याप्रमाणे या कार्यक्रमात कै.बाळासाहेब जगे शहापूर तालुका ऊत्कृष्ट पुरस्कार २०२५ हा - सचिन राऊत, उत्कृष्ट युट्युब चॅनल कै.नंदकुमार लिमये पुरस्कार. - विचार वादळ न्युज चॅनेल आणि स्व. कृष्णाजी भेरे ऊत्कृष्ट दैनिक /साप्ताहिक पुरस्कार. - दै. अग्रलेख संपादक ऊमेश भेरे यांना प्रदान करण्यात आला आहे. रूपये ५ हजाराचा धनादेश, स्मृतिचिन्ह देऊन सत्कार्थींना सन्मानित करण्यात आले. यावेळी महेश धानके, सोमनाथ काबाडी, नंदकुमार मोगरे, बाळासाहेब खारीक आदी जेष्ठ पत्रकारांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात हरिओम भजनी मंडळ आवारे. गायिका आचलदेवी घरत यांनी भक्तीगीत सादर केली तर प्रकाश जाधव यांनी शोधीशी मानवा राऊळी मंदिरी हे गीत सादर केले. यावेळी खबर २४ तासचे दिनेश पाचघरे. अंकुश भोईर, सुनील फर्डे, अंकुश भोईर, प्रकाश जाधव, ऊमेश भेरे, जयवंत भडांगे, अनिलजी घोडविंदे, वामन केदार, अनंत बोरसे, भगवान फर्डे, ऊमेश जोशी, अविनाश कापडणे, आशाताई पडवळ, मिनाक्षी मडके-कथोरे, प्रशांत गडगे रविंद्र खाडे आदी पत्रकार उपस्थित होते. शिवाजी सातपुते यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि निवेदन केले. तर कार्यक्रमाचे यशस्वी करण्यासाठी रविंद्र सोनावणे-शहापूर तालुका अध्यक्ष, अंकुश सातपुते, निलेश विशे, सोमनाथ शिर्के, दिलिप वरकुटे, अंकुश भोईर, विठ्ठल धारवणे, प्रसाद भोईर, अतुल भोईर या पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली.

### शाळेच्या विद्यार्थ्यांना सुरक्षिता विषयावर जनजागृती कार्यक्रम आयोजित



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.०६, कल्याण (ठाणे) :** कोळसेवाडी पोलीस ठाण्यातर्फे सोमवार, दिनांक ०६ जानेवारी २०२५ रोजी रेझिंग डे निमित्ताने मॉडेल इंग्लिश स्कूल कोळसेवाडी कल्याण पूर्व शाळेच्या विद्यार्थ्यांना सायबर प्रौढ, महिला सुरक्षेच्या बाबत संवाद साधून जनजागृती कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते. सदर विद्यार्थ्यांना पोलीस ठाणे तर्फे गुड टच, बॅड टच तसेच सोशल मीडिया वापर आणि विनापरवाना वाहन चालवणं याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये शाळेचे ७० ते ७५ विद्यार्थी आणि ४ शिक्षक उपस्थित होते.

## पाण्याचा लढा तीव्र करण्याची भूमिपुत्रांनी घेतली शपथ

### पुढील ६ महिन्याचा कृती कार्यक्रम ठरला



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील दुष्काळी गावांना शेतीसाठी कुकडी प्रकल्पातून हक्काचे पाणी मिळाले पाहिजे. ही गेली ४० वर्षापासून ची मागणी आहे. पण अद्याप पर्यंत कोणत्याच योजना कार्यान्वित झाल्या नाही. सर्वच राजकीय पुढाऱ्यांनी आश्वासन देऊन एक प्रकारे फसवणूक केल्याची भावना जनतेची झाली आहे. पण आता तालुक्यातील दुष्काळग्रस्त गावातील शेतकऱ्यांनी आता हा लढा तीव्र करण्याचा पवितत्राच दुष्काळग्रस्त गावातली भूमिपुत्र शेतकऱ्यांनी घेतला आहे.

कान्हूर पठार (ता.पारनेर) गणपती चौफुला मंदिर सभागृहात बैठक पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते दादाभाऊ सोनावळे हे होते. या बैठकीत पुढील आंदोलनाची दिशा ठरवून ६ महिन्याचा कृती कार्यक्रम ठरवण्यात आला.

यामध्ये पहिल्या टप्प्यात १२ जानेवारी जिजाऊ जयंती दिवसापासून गावागावात जनजागृती करून सह्यांची मोहीम राबवून कृती समिती स्थापन करून आमदार, खासदार, जलसंपदा मंत्री यांना निवेदन देण्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. केंद्रात आणि राज्यात महायुतीचे सरकार असून तालुक्यातील आमदार पण माहायुतीचे आहे. त्यातच जलसंपदा खात ही जिल्ह्यातील नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांना मिळाले असल्यामुळे हा प्रश्न मार्गी लागण्यास मार्ग सुकर झाला असल्याच्या भावना आता तालुक्यातील जनतेच्या झाल्या आहे. शेतकऱ्यांचा अपेक्षाभंग होणार नाही. याची काळजी हे सरकार घेईल. अशी अपेक्षा तालुक्यातील जनतेला वाटत आहे.

या कार्यक्रमाचे नियोजन अब्बास मुजावर, सुयश वाळुंज यांनी केले. या वेळी भूमिपुत्र संघटनेचे अध्यक्ष संतोष वाडेकर, वसंत शिंदे, अशोक आंधळे, जालिंदर वाबळे, बाळशिराम पायमोडे, मोहन रोकडे, भिकाजी जगदाळे, संपत कळसकर, द.मा.ठूबे,एस.एल.ठूबे,सुरेश भागवत, महादेव नवले, सखाराम ठुबे, सखाराम भागवत, सुभाष करंजुले, संतोष वाबळे, मनोज तामखडे, प्रवीण खोडदे, विशाल थोरात, अनिल सोबले, अरुण बेलकर, बाळासाहेब वाळुंज, यांच्यासह तालुक्यातून शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ढोकेश्वर विद्यालयात पत्रकार दिन उत्साहात साजरा




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, पारनेर (अहिल्यानगर) :** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मराठी पत्रकार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी टाकळी ढोकेश्वर आणि परिसरातील सर्व पत्रकार बांधवांचा संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सन्मा. सिताराम आण्णा खिलारी व प्राचार्य सुनिल वाव्हळ यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यामध्ये दैनिक लोकमतचे बबनराव गायके, तालुका प्रतिनिधी शरदराव झावरे, दैनिक पुढारी चे दादाभाऊ भालेकर, सी न्युजचे बाळासाहेब गायकवाड व दैनिक अक्षराज चे वसंतराव रांधवण, श्रीनिवास शिंदे, पारनेर दर्शन चे संजय मोरे या सर्व पत्रकारांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार बबनराव गायके यांनी लोकशाहीचे चार स्तंभ त्यापैकी पत्रकारिता म्हणजे काय याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य सुनिल वाव्हळ, पर्यवेक्षक बाळासाहेब खिलारी,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अजय ठुबे, प्रशांतजी तराळ, ज्येष्ठ शिक्षक बाळासाहेब निवडुंगे, मल्हारी वाघसकर, वैशाली गायखे, सोनल रोहकले, निलम खिलारी, रवींद्र मते, रवींद्र ज्योतिक, नारायण शेळके, संदीप महांडुळे, सुरेखा ठाणगे, सचिन महानवर,पोपटराव जगदाळे, प्रिया डव्हणे, अशोक वाघ, राजेंद्र ढोणे, सुमन वाळुंज, अनिता म्हस्के, वैशाली ढोकळे, प्रा. विजय सोबले, शिवाजी नरसाळे, कल्पना जाधव, सुशांत खेडकर, सोमनाथ होरणे, अनुष्का कांबळे, विष्णू भद्रे, अमोल गोरे, नारायण हरेल इत्यादी शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन अतुल सैद यांनी केले, प्रास्ताविक व अध्यक्षीय निवड रवींद्र ज्योतिक यांनी केली तर आभार मल्हारी वाघसकर यांनी मानले.

## ५०व्या कुमार/कुमारी गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरीता महाराष्ट्राचे संघ जाहीर

### वैभवी जाधव, अनुज गावडे या दोन्ही पुणे ग्रामीणच्या खेळाडूंच्या खांद्यावर महाराष्ट्राच्या नेतृत्वाची धुरा






**अक्षराज : संदिप येवले**

**दि.०६, घाटकोपर (मुं.उपनगर) :** भारतीय हौशी कबड्डी महासंघाच्या मान्यतेने उत्तर प्रदेश राज्य कबड्डी असो.च्या विद्यमाने होणाऱ्या ५०व्या कुमार/कुमारी गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरीता महाराष्ट्राने आज आपले दोन्ही संघ जाहीर केले. वैभवी जाधव, अनुज गावडे या दोन्ही पुणे ग्रामीणच्या खेळाडूंकडे अनुक्रमे कुमारी व कुमार गटाचे नेतृत्व सोपविण्यात आले आहे.

नुकतेच सांगलीवाडी, सांगली येथे झालेल्या कुमार/कुमारी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेतून हे संघ निवडण्यात आले आहेत. उत्तर प्रदेशातील हरिद्वार येथील रोशनबाद बंदिस्त क्रीडा संकुल येथे ही राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा दिनांक ८ ते ११ जानेवारी २०२५ या कालावधीत खेळविण्यात येईल. महाराष्ट्राचे निवडलेले हे दोन्ही संघ सोमवार, दिनांक ०६ जानेवारी २०२५ रोजी पहाटे ००-२० वाजता बांद्रा टर्मिनस येथून हरिद्वार एक्स्प्रेसने स्पर्धेकरीता रवाना झाले. राज्य कबड्डी असो.चे सचिव बाबुराव चांदेरे यांनी हे निवडण्यात आलेले आहे .

**कुमारी गट :-** १) वैभवी जाधव-(संघनायिका), २) साक्षी रावडे, ३) प्रतिक्षा लांडगे, ४)सृष्टी मोरे (सर्व पुणे ग्रामीण), ५)साक्षी गायकवाड, ६)रेखा राठोड, ७)भूमिका गोरे (सर्व पिंपरी चिंचवड), ८) श्रेया गावंड (ठाणे), ९) वैष्णवी काळे (अहमदनगर), १०)मोनिका पवार (जालना), ११)आरती चव्हाण (परभणी), १२)कादंबरी पेडणेकर (मुं. शहर - पूर्व).प्रशिक्षक:- महेंद्र माने.

**व्यवस्थापिका :-** निकिता लाड.

कुमार गट:- १)अनुज गावडे - (संघनायक), २)महेश मोने, ३) जयंत काळे (सर्व पुणे ग्रामीण), ४) आफताब मंसुरे, रोहन तुपारे, ६) आदित्य पिलाणे (सर्व ठाणे शहर), ७)विजय तारे (परभणी), ८)समर्थ देशमुख (कोल्हापूर), ९)असीम शेख (नंदुरबार), १०)आदित्य येसगुडे (सांगली), ११)ओम् कुदळे (मुंबई उपनगर पश्चिम), १२)राज मोरे (रायगड).प्रशिक्षक:- आयुब पठाण. व्यवस्थापक :- वैभव पाटील.

## तलासरी मध्ये अखिल भारतीय आदिवासी पत्रकार संघटनेकडून पत्रकार दिन साजरा




**अक्षराज : निलेश कासट**

**दि.६ तलासरी (पालघर) :** मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक, दर्पण या आपल्या पहिल्या वृत्तपत्रापासून वृत्तपत्र सृष्टीचा पाया रचणारे आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निमित्ताने ६ जानेवारी मराठी पत्रकार दिन साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून अखिल भारतीय आदिवासी पत्रकार संघटनेचेकडून तलासरी येथील शासकीय विश्रामगृह येथे साजरा करण्यात आला. सर्वप्रथम दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आदिवासी आद्य क्रांतिकारक बिरसा मुंडा यांच्या प्रतिमा चे पूजा पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमामध्ये पालघर जिल्ह्यातील जेष्ठ पत्रकार के. के. पाटकर व कर्वे यांचे संघटनेकडून साल श्रीफळ व प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी उपस्थित कार्यक्रमामध्ये मार्गदर्शन करताना अँड. विराज गडग यांनी पत्रकारांच्या साहाय्याने अनेक समस्या सोडवण्यासाठी पत्रकार महत्वाचा असून अनेक समस्या त्यांच्या लेखणीतून सोडवल्या जात असल्याचा अनुभव त्यांनी व्यक्त केला.

तर जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण व वित्त सभापती काशिनाथ चौधरी यांनी आपले विचार व्यक्त करताना प्रशासन आणि जनता यामध्ये सांगड घालण्याचा काम पत्रकार असतो. पत्रकार समाजातील दुवा असून अनेक अन्याय ग्रस्त समाजाची बाजू मांडत असतो.

तर तलासरी तहसीलदार अमोल पाठक यांनी बदलत्या डिजिटल युगात ही वृत्तपत्र महत्वाचे काम करत असून मध्ये वृत्तपत्र लेख, अग्रलेख यांचे वाचक आहेत. तर पत्रकारांने जनमत आणि प्रबोधन व न्याय देणे याबाबत काम करणे गरजेचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तर या कार्यक्रमामध्ये तलासरी नगरपंचायतीचे नगराध्यक्ष

सुरेश भोये यांनी पत्रकार हा समाजाप्रती संवेदना, तसेच वास्तव मांडण्याचे काम करत असतो. सध्या पत्रकार हा लोकशाही चा पहिला आधार स्तंभ आहे,असं मानल पाहिजे.

पत्रकार हा समाजाचा आरसा असून त्याने समाजातील ज्वलंत प्रश्न मांडणे गरजेचे असून प्रशासन, लोकप्रतिनिधी व जनता यामधील पत्रकार हा महत्वाचा दुवा आहे असे मत यावेळी व्यक्त केले.

या तर या कार्यक्रमामध्ये संघटनेचे प्रवीण चव्हाण, निलेश कासट व सतेंद्र मातेरा यांनी पत्रकार दिनानिमित्ताने मार्गदर्शन, शुभेच्छा दिल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रस्ताविक नितीन बोंबाडे यांने केले. यावेळी कार्यक्रमाला तलासरी नगराध्यक्ष सुरेश भोये, तलासरी तहसीलदार अमोल पाठक, जिल्हा परिषद सदस्य काशिनाथ चौधरी, तलासरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विजय मुथडक, युवा एल्गार आघाडीचे अँड. विराज गडग

सामाजिक कार्यकर्ते सुरेश पाडवी, ठाणे ग्रामीणचे फरीद माणेशिया, पत्रकार शौकत शेख तर आदिवासी पत्रकार संघटनेचे पदाधिकारी व मोठ्या संख्येने सदस्य उपस्थित होते.

